# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ०६/२०२२ दिनांक : 03/01/२०२२**

**पोलीस अधिक्षक कार्यालयात जेष्ठ नागरीकांची बैठक झाली संपन्न...**

नांदेड पोलीस दलाचे वतीने अधिक्षक कार्यालय नांदेड येथे व जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक ०२ जानेवारी, २०२२ ते दि. ०८ जानेवारी, २०२२ या दरम्यान पोलीस रेझींग डे च्या निमित्ताने विवीध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन दिनांक ०३ जानेवारी, २०२२ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे व जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशन अंतर्गत जेष्ठ नागरीकांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी **सपोनि श्री अशोक कोलते** होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन **डॉ. हंसराज वैद्य** आणि **श्री अशोक तेरकर** यांची उपस्थिती होती. बैठकी मध्ये जेष्ठ नागरीकांच्या विवीध समस्या आणि त्यांना दिली जाणारी कायदेशिर मदत, जेष्ठांनी कोरोना काळात घ्यावयाची काळजी, जेष्ठांच्या समस्या आणि उपाय इत्यादी विषयावर चर्चा करण्यात आली. प्रमुख पाहुणे **डॉ हंसराज वैद्य** यांनी जेष्ठांनी कोरोना काळात घ्यावयाची काळजी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले आणि शासनाने जेष्ठ नागरीकांना बुस्टर डोस देण्यात यावी असी मागणी केली. तर **श्री अशोक तेरकर** यांनी जेष्ठ नागरीकांना मार्गदर्शन केले. **सपोनि श्री अशोक कोलते** यांनी अध्यक्षीय समारोपात जेष्ठांनी आवश्यक ती सर्व काळजी कोरोना काळात घ्यावी असे सांगीतले.

सदर बैठकीस डॉ. निर्मला कोरे, डॉ. पुष्पा कोकीळ, मेहमुदा खान, जयवंत सोमवाड, रामचंद्र कोटलवार, डॉ. दिपक केसरी, चंद्रकांत जठाळ, प्रभाकर कुंटूरकर, सुधाकर अंबेकर, अनिल पांपटवार, माधवराव काटकळंबकर, शिवराम पांचाळ, एन एच लखमवाड इत्यांदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **सपोउपनि संजय जोशी** यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी भरोसा सेलच्या मपोह/डॉ. ज्योती कदम, मपोना/संगीता चौधरी, मपोकॉ/शुभांगी जाधव, जयश्री शिंदे, यांनी परिश्रम घेतले.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड


भरोसा सेल

